# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय ठाणे

**वाचा:-** १) शासनाचे महसूल व वन विभागाकडील पत्र क्र.पीआयएल-२०१४१/प्र.क्र./१८७/ज-१, दिनांक.१९ सप्टेंबर-२०१४
२) मा.विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचेकडील पत्र क्र.मशा/कार्या-२/ज-३/कावि-९/२०१४ दिनांक.२३/९/२०१४

---

क्र.सामान्य कक्ष-३/टे-१/नपा/जनहित याचिका/१४
जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे
दिनांक.२४/०९/२०१४

**आदेश:-**

ज्याअर्थी सुस्वराज्य फांऊडेशन सातारा व इतर यांनी जनहित याचिका क्र.१५५/२०११, १३६/२००९, २५/२०१३, ४५/२००९ मा. उच्च न्यायालय येथे दाखल केलेली आहे.

ज्याअर्थी उपोदघातातील अ.क्र.१ मध्ये असे नमूद केले आहे की, मा.उच्च न्यायालयाने दिनांक.०६/०८/२०१४ रोजी पारित केलेले आदेश व त्यामध्ये नोंदविलेले निष्कर्ष आणि महसूल समन्वय अधिकारी, यांना दिलेल्या निर्देशांबाबत सत्वर विहीत मुदतीत कार्यवाही करणेबाबत निदेश दिलेले आहेत.

त्याअर्थी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार आपली समन्वय अधिकारी व सक्षम अधिकारी म्हणून खालील महानगरपालिका समोर नमूद केलेल्या उपजिल्हाधिकारी, यांची नियुक्ती करण्याबत येत आहे.

| अ.क्र. | महानगरपालिका | समन्वय अधिकारी |
|---|---|---|
| १ | ठाणे | उपविभागीय अधिकारी, ठाणे |
| २ | कल्याण-डोबिंवली | उपविभागीय अधिकारी, कल्याण |
| ३ | भिवंडी-निजामपूर | उपविभागीय अधिकारी,भिवंडी |
| ४ | उल्हासनगर | उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर |
| ५ | मिरा-भाईंदर | उपजिल्हाधिकारी, (पुर्नवसन) ठाणे |
| ६ | नवी मुंबई | उपजिल्हाधिकारी, मेंट्रोसेंटर-३ ठाणे |

उपरोक्त नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अॅक्ट १९४९, महाराष्ट्र मालमत्ता विद्रुपीकरन कायदा व विरूपीकरण (प्रतिबंध) कायदा १९९५ व मुंबई महानगरपालिका कायदा १८८८ च्या अंतर्गत मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक.०६/०८/२०१४ च्या आदेशानुसार अनधिकृत होर्डिंग्ज तसेच याबाबतचे विद्रुपीकरणच्या तक्रारी प्रकरणात तातडीने कार्यवाही करावी. केलेल्या कार्यवाहीबाबत दर चार महिन्यांनी मा. उच्च न्यायालयात शपथपत्र दाखल करावे तसेच या कार्यालयास केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दयावा.

सही/-xxx
(पी.वेलरासू)
जिल्हाधिकारी, ठाणे

प्रति,

उपविभागीय अधिकारी, ठाणे/कल्याण/भिवंडी/उल्हासनगर/ उपजिल्हाधिकारी, पुर्नवसन ठाणे,
उपजिल्हाधिकारी, मेट्रो सेंटर-३
स्थळ प्रतिवर मा.जिल्हाधिकारी
यांची सही असे

जिल्हाधिकारी, ठाणे करीता.

कार्यालयाचा पत्ता :- जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, कोर्ट नाका, ठाणे (पश्चिम), पिन कोड -400601
दूरध्वनी क्र. - 022/25301737, 022/25343636 फॅक्स नं. - 25349200, ई मेल-collector.thane@ maharashtra.gov.in